महाराष्ट्र शासन

वनविभाग

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय.

## खेळाडू प्रवर्गामधील उमेदवारांना सूचना

कोल्हापूर वनवृत्तामधील वनरक्षकांची १०० रिक्त पदे भरणेकरीता जाहिरात क्रमांक ४/२०१६ प्रसिध्द करण्यात येऊन उमेदवारांकडून महाऑनलाईनद्वारे अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

कोल्हापूर वनवृत्ताकडून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये खेळाडूसाठी खालीलप्रमाणे समांतर आरक्षण नमूद करण्यात आलेले आहे.

| विभाग / कार्यालयाचे नांव | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन २०१६ करीता | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ | ५ |

वरीलप्रमाणे खेळाडू या समांतर आरक्षणानुसार ऑनलाईनद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने उमेदवारांची पंचतारांकित एमआयडीसी कागल जि.कोल्हापूर येथे दिनांक ५.११.२०१६ ते १४.११.२०१६ या कालावधीमध्ये शारिरीक क्षमता चाळणी चाचणी (पुरुष उमेदवार ५ कि.मी./महिला उमेदवार ३ कि.मी. अंतर अर्ध्या तासात पार करणे) प्रगतीपथावर आहे.

ज्या उमेदवारांनी खेळाडू या समांतर आरक्षणामध्ये ऑनलाईनद्वारे अर्ज सादर करुन खेळाडू प्रवर्गाकरीता दावा केलेला आहे व जे उमेदवार वरील शारिरीक क्षमता चाळणी चाचणीमध्ये भाग घेऊन अर्ध्या तासात वरीलप्रमाणे अंतर पार करतील अशा सर्व खेळाडूंना कळविण्यात येते की, त्यांना महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक १ जुलै,२०१६ मधील तरतूदी लागू राहतील.

खेळाडू या समांतर आरक्षणामधील उमेदवारांची प्रवर्गनिहाय रिक्त पदसंख्येच्या तीन पट (१:३) तयार करण्यात लघुयादीमध्ये समाविष्ठ होणा-या खेळाडूंना सदर शासन निर्णयामधील परिच्छेद ६ मधील (viii) नुसार अर्ज करण्यापूर्वीच वरील सुधारित तरतुदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवाराने अर्जासोबतच विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील. (ix) वरीलप्रमाणे पडताळणी केलेल्या क्रीडा प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत सादर असल्याशिवाय सदर खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार करण्यात येऊ नये.

शारिरीक क्षमता चाळणी चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या खेळाडू या समांतर आरक्षणामधील उमेदवारांची १:३ या प्रमाणात लघु यादी तयार करुन सदर उमेदवारांना पुढील टप्प्याकरीता (शारिरीक मोजमापे व मूळ कागदपत्रांची तपासणी इ.) करीता बोलाविण्यात आलेनंतर त्या उमेदवारांकडे सुधारित तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेतली असलेबाबतचे प्रमाणपत्राची प्रत असल्याशिवाय सदर खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कोल्हापूर

दिनांक ८.११.२०१६.

(अे.एम.अंजनकर)

सदस्य सचिव, प्रादेशिक निवड समिती तथा

उपवनसंरक्षक सातारा वनविभाग.

क्रमांक - ब/मुवसंको/कक्ष-४-३/आस्था/ ४३५२ /२०१६-१७.

कोल्हापूर दिनांक ८.११.२०१६.

प्रत- मुख्य परिचलन अधिकारी, मे.महाऑनलाईन लि.मुंबई.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या सूचना महाऑनलाईनचे संकेतस्थळावर तात्काळ अपलोड करण्यात याव्यात.

Scanned by CamScanner